# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/ ४५ /२०२४-२५** **दिनांक: २९ /०४/२०२४**

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प.)

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
**जनसंपर्क विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- वृत्तपत्रामध्ये जाहिर आवाहन प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान विभागाची सोबत जोडलेले जाहिर आवाहन वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

सदर जाहिर आवाहन वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याची प्रत उद्यान विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत :- जाहिर आवाहन प्रत.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप.आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**झाडांना खिळे ठोकणे, झाडांवर पोस्टर्स / भित्तीपत्रके व जाहिरात लावणे, झाडांवर विद्युत रोषणाई करणे व विद्रुपीकरणास प्रतिबंध करणेबाबत जाहीर आवाहन**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. काही व्यावसायिक हे त्यांच्या व्यवसायांची जाहिरात व्हावी या हेतुने मुख्यत्व रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना खिळे ठोकुन जाहिरात लावतात. तसेच पोस्टर, भित्तीपत्रके, इ.द्वारे जाहिरात चिटकवतात. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या समोरील झाडांवर विद्युत रोषणाई करतात. यामुळे झाडांना इजा पोहचत असून झाडांवरील सजीवांवर त्याचा दुष्परिणाम होत आहे. तसेच शहराच्या सौदर्यास बाधा पोहचून शहराचे विद्रुपीकरण होत आहे व पर्यावरणास हानी पाहेचत आहे.

याद्वारे सर्व संबंधितांना जाहिर आवाहन करण्यात येते की, त्यांनी झाडांवर पोस्टर्स, भित्तीपत्रके व जाहिरात इ. साहित्य झाडांवर खिळे ठोकून लावली असल्यास, तसेच झाडांवर विद्युत रोषणाई केली असल्यास हे जाहीर आवाहन प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत काढून घ्यावे. या कालावधीनंतर अशा प्रकारे कृत्य केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल, तसेच राष्टीय हरित लवादाचे आदेश व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

कल्पिता पिंपळे
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईदर महानगरपालिका